# <u>प्रेस नोट</u>

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील स्वारगेट पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- १५/०५/२०१८

स्वारगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे बाबु मल्लिकार्जुन शेकापुरे, वय २७ वर्षे, रा. ४२५/२६ समाज मंदीराजवळ, मिनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ)(ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ०४/२०१८ दिनांक १५/०५/२०१८ रोजी दोन वर्षा करीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम जखमी करणे, हाताने मारहाण करुन शिवीगाळ करणे, सामाईक इरादा, खून करण्याचा प्रयत्न, बेकायदेशिर जमाव जमविणे, दंगा करणे, प्राणघातक शस्त्र घेवून दंगा करणे, बेकायदेशिर जमावाचा सभासद, नुकसान करणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द स्वारगेट पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास डॉ. प्रवीण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातुन दोन वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

**(डॉ. प्रविण मुंढे)**
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ २, पुणे शहर